THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 4TH MAY 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं दिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ९ माहे मार्च सन १८९३ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९३ चा आक्ट नंबर ५.

**ब्रिटिश हिंदुस्तानच्या हद्दींबाहेरील मुलुकांत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांना जी हुकुमत आहे ती हुकुमत त्या मुलुकांत, किंवा त्या मुलुकाच्या संबंधानें, चालविणाऱ्या ब्रिटिश कोर्टांनीं केलेल्या मरणाच्या शिक्षेच्या हुकुमांची बजावणी ब्रिटिश हिंदुस्तानांत करणें कित्येक प्रसंगीं कायदेशीर आहे असें ठरविण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांना ब्रिटिश हिंदुस्तानच्या हद्दींबाहेरील मुलुकांत जी हुकुमत आहे ती हुकुमत त्या मुलुकांत, किंवा त्या मुलुकाच्या संबंधानें, चालविणाऱ्या ब्रिटिश कोर्टांकडून कधीं कधीं मरणाच्या शिक्षेचा हुकुम करण्यांत येतो;

आणि ज्या अर्थीं अशा मुलुकांत मरणाच्या शिक्षेचा हुकुम झालेल्या कैद्याला कैदेंत ठेवण्यासाठीं कोणतीहि योग्य बंदोबस्ताची जागा, किंवा कांहीं विद्रूप प्रकार न दिसे व विशेष पीडा न होई अशा रीतीनें त्याला फांशीं देण्याचीं वाजवी साधनें नसण्याचा संभव असतो;

त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

ब्रिटिश हिंदुस्तानांत साधारणतः अमलांत आणतां येत नाहींत असे कित्येक मरणाच्या शिक्षेचे हुकुम ब्रिटिश हिंदुस्तानांत अमलांत आणणें.

१. जेव्हां या आक्टाच्या उपोद्घाताच्या पहिल्या पारिग्राफांत सांगितल्या प्रकारची हुकुमत चालवून एकाद्या ब्रिटिश कोर्टानें—

(अ) कोणत्याहि मनुष्यास मरणाच्या शिक्षेचा हुकुम केला असेल, आणि,

(ब) सदर्हू उपोद्घाताच्या दुसऱ्या पारिग्राफांत सांगितल्या प्रकारच्या कोणत्याहि कारणानें तो शिक्षेचा हुकुम ब्रिटिश हिंदुस्तानांत अमलांत

आणावा असें त्या कोर्टास वाटून तो शिक्षेचा हुकुम अमलांत आणण्याबाबदचें आपलें वारंट ब्रिटिश हिंदुस्तानांतील एकाद्या तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटावर किंवा रखवालदारावर केलें असेल,

तेव्हां अशा सुपरिंटेंडेंटानें किंवा रखवालदारानें, असें वारंट मिळाल्यावर, त्या मनुष्यास फांशीं देण्याचें काम त्या वारंटांत ठरविलेल्या जागीं, तें वारंट सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ३८१ व्या कलमांतील ठरावांअन्वयें योग्य रीतीनें केलें असतें तर तें काम ज्या रीतीस व ज्या शर्तींस अनुसरून अमलांत आणविलें असतें त्याच रीतीस व त्याच शर्तींस सर्व बाबतींत अनुसरून अमलांत आणविलें पाहिजे.

कोणत्या तुरुंगामध्यें शिक्षेचे हुकुम अमलांत आणावयाचे त्याबाबद.

२. ज्या तुरुंगांच्या सुपरिंटेंडेंटांनीं किंवा रखवालदारांनीं अशा कोणत्याहि वारंटांअन्वयें शिक्षेचे हुकुम अमलांत आणावयाचे ते तुरुंग, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल किंवा या बाबतींत त्यांनीं अधिकार दिलेलें स्थानिक सरकार सामान्य किंवा विशेष हुकुम करून फर्मावील त्या प्रकारचे असले पाहिजेत.

कित्येक न्यायसभांना या आक्टाअन्वयें ब्रिटिश कोर्टें मानणें.

३. सन १८७१ च्या कैद्यांच्या आक्टाच्या १९ व्या कलमांतील विशेष ठरावांत सांगितलेल्या न्यायसभा, ह्या आक्टाच्या कारणांसाठीं ब्रिटिश कोर्टें आहेत असें मानलें पाहिजे :

मात्र असें ठरविलें आहे कीं अशा कोणत्याहि कोर्टानें या आक्टाअन्वयें केलेल्या प्रत्येक वारंटावर, त्या कोर्टांत अध्यक्षस्थानीं बसणाऱ्या जज्जांपैकीं जो एक जज्ज सदहू विशेष ठरावांत सांगितलेला सरकारी अमलदार असेल त्यानें सही केली पाहिजे.

(सही) जे. एम्. माक्फर्सन,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.